प्रकरण पहिले

# मराठी सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी

प्रा. अश्विनी खवळे

# १) मराठी सत्तेच्या उद्याची पार्श्वभूमी

❖ राजकीय परिस्थिती
❖ सामाजिक परिस्थिती
❖ धार्मिक परिस्थिती
❖ आर्थिक परिस्थिती

# राजकीय परिस्थिती (पार्श्वभूमी)

## १) विजयनगरची प्रेरणा –

- हरिहर आणि बुक्क या बंधूनी श्रीमाधवाचार्य विद्यारण्य स्वामी यांच्या आशीर्वादाने इ.स. १३३६ साली तुंगभद्रा नदीच्या काठावर विजयनगर या हिंदू राज्याची स्थापना केली.
- तथापि दक्षिणेतील पाच मुस्लिम शाह्यांनी एकत्रीत येऊन इ. स. १५६५ साली ताळीकोटच्या लढाईत विजयनगरचा भयानक विध्वंस केला. विजयनगरचे साम्राज्य म्हणजे हिंदूचे वैभव, हिंदू संस्कृतीचे तेजस्वी केंद्र व हिंदूचे भावी आशास्थान होते अशा वैभवशाली नगराचा मुस्लीमांनी नाश केला स्त्री-पुरुषांची कत्तल केली.
- भव्य इमारती, सुंदर मंदिरे उध्वस्त केली अगणित संपती लुटली. अशा वैभवशाली शहराचा नाश हिंदूच्या स्मरणात राहिला होता आपण पुन्हा एकवेळ हिंदूचे राज्य निर्माण केले पाहिजे असे हिंदूना मनोमन वाटू लागले त्यांची इच्छा शिवरायांनी पूर्ण केली.

# VIJAYANAGAR EMPIRE




Study.com

# (२) उत्तरेतील बादशाही आणि दक्षिणेतील राजकीय स्थिती -

- हिंदूस्थानच्या राजकारणात बद्दल होऊन इ.स. १५३६ साली उत्तरेच्या राजकारणात मोगलंच्या उदय झाला तर दक्षिणेतील बहामनी राज्याचा शेवट घडून आला.
- बाबराने पहिल्या पानिपत युध्दात दिल्लीवर राज्य करणाऱ्या इब्राहिम लोदीचा पराभव करुन दिल्लीमध्ये बादशाहीचा पाया घातला.
- बाबरापासून औरंगजेबापर्यंतचे सर्वच मोगल राज्यकर्ते साम्राज्यवादी स्वभावाचे होते सर्व हिंदूस्थान आपल्या ताब्यात आणण्यासाठी त्यांनी दक्षिणेत प्रवेश करुन दक्षिणेतील खाणदेश, वऱ्हाड, अहमदनगर, गोवल कोंडा, विजापूर इत्यादी प्रदेश जिंकून निजामशाही, कुतूबशाही आणि आदिलशाहीचा पराभव केला
- इ.स. १६३६ साली दक्षिणेचा सुभेदार म्हणून औरंगजेबाची नेमणूक झाली त्याच्या सुभ्यात खाणदेश, वऱ्हाड, तेलंगणा व दौलताबाद या चार प्रांतांचा समावेश होता. अशाप्रकारे मोगलांनी दक्षिणेवर वर्चस्व प्रस्थापित करण्यास सुरुवात केली होती.



मोगल शासक

# ३) दक्षिणेतील मुस्लिम राजवटी आणि मराठ्यांचे राजकारण

- इ.स. १५२६ मध्ये बहामनी राज्याचे पाच तुकडे झाले त्यालाच वरिदशाही (विदर), आदिलशाही (विजापूर), कुतूबशाही (गोवळकोंडा), इमादशाही ( वऱ्हाड), निजामशाही (अहमदनगर) असे म्हणतात.
- मराठी सत्तेच्या उदयाच्यावेळी दक्षिणेतील या पाच शाह्यापैकी आदिलशाही, निजामशाही व कुतूबशाही या तीनच शाह्या अस्तित्वात होत्या . निजामशाहीने इमादशाही तर आदिलशाहीने बरिदशाही नष्ट केली होती. साहजिकच उत्तरेतून दक्षिणेत घुसणाऱ्या मोगलशाहीला तोंड देण्याची पाळी या तीन शाह्यावर आली होती.
- विशेष म्हणजे दक्षिणेतील शाह्यांना मोगलांची भिती वाटत होती. महाराष्ट्रातील मराठ्यांचे राजकीय स्वातंत्र्य देवगीरीच्या पाडावाबरोबरच नष्ट झाले होते. त्यामुळे इस्लामी राज्यकर्त्यांशी मराठ्यांना जुळवून घ्यावे लागले तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थीती मराठ्यांचा पराक्रम यामुळे मुसलमानांना दक्षिणेत अपेक्षेप्रमाणे यश झाले नाही.
- सतराव्या शतकात दक्षिणेच्या राजकरणात अनेक मराठा घराण्यांचा उदय झाला, जाधव, निंबाळकर, शिर्के, गुजर, माने, भोसले, मोरे, घाटगे, घोरपडे, मोहिते इत्यादी घराण्यातील सरदारांनी निजामशाहीची, आदिलशाहीची प्रामाणिकपणे चाकरी केली.
- मराठा सरदाराकडे शौर्य, पराक्रम, धाडस, मुत्सद्दीपणा इत्यादी स्वतंत्र्य राज्य स्थापन करण्यासाठी आवश्यक असणारे गुण होते तथापि त्यांचे स्वतःचे राज्य नसल्यामुळे मुस्लिमांची चाकरी करण्यातच त्यांची शक्ती खर्ची पडत असे. मराठी सरदारांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्यात ऐक्याचा अभाव होता, इतकेच नाहीतर त्यांच्यात सतत झगडे होत असत.



## ४) सिद्धीबरोबर संघर्ष

महाराष्ट्रात मराठी सत्तेचा उदय होत असतानाच भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर सिद्धी आणि पोर्तुगीज या सागरी सत्तांचा उदय होऊन त्यांनी मराठा राज्याला धोका निर्माण करण्यास सुरुवात केली.

दंडाराजापुरी , जंजिरा किल्ला इत्यादी ठाणी सिद्धीची शक्तीस्थाने होती सिद्धीने काळाच्या ओघात निजामशाही, आदिलशाही व शेवटी मोगलांची चाकरी केलेली होती.

मोगलाची चाकरी स्विकारण्यापूर्वी तो आदिलशाहीचा सरदार होता. आदिलशहाने पूर्वीच्या प्रदेशाशिवाय नागोठाण्यापासून बाणकोटापर्यंतचा प्रदेश सिध्दिच्या ताब्यात दिलेला होता.

अशा प्रकारे पश्चिम किनाऱ्यावर सिद्धीची सत्ता चालत होती. महाराजांनी स्वराज्यासाठी कोकणातील प्रदेश जिंकण्याचा उद्योग सुरु करताच त्यांचा सिद्धीशी संघर्ष सुरु झाला हा संघर्ष छत्रपती शाहूच्या काळापर्यंत टिकून राहिला.

## ५) पोर्तुगीजांशी संघर्ष -

पोर्तुगीज ही पाश्चिमात्य सत्ता असून पाश्चिमात्य सत्तांपैकी पोर्तुगीज सर्वप्रथम भारतात आले होते त्यांच्या आगमनापासून भारतात प्रबोधन काळाला सुरुवात झाली.

पोर्तुगीजांनी गोवा, दीव, दमण, साठी, वसई, बारदेश, मुंबई, चौल इत्यादी ठिकाणी आपल्या वसाहती स्थापन करुन व्यापार व धर्मप्रसार करण्यास सुरुवात केली

महाराजांना ज्याप्रमाणे स्वराज्य स्थापन करण्यासाठी मोगल, आदिलशहा सिद्धी यांच्याबरोबर संघर्ष करावा लागला त्याप्रमाणे त्यांना पोर्तुगीजाबरोबरदेखील संघर्ष करावा लागला.

# ६) महाराष्ट्रधर्म संकल्पना-

- १७ व्या शतकात महाराष्ट्रावर मुस्लिम राजवटीची सत्ता होती. महाराष्ट्र पारतंत्र्यात खितपत पडला होता, महाराष्ट्र मुस्लिमांचा आणि परकियांचा गुलाम बनला होता.
- साहजिकच महाराष्ट्र मराठ्यांचा व्हावा, महाराष्ट्राला स्वातंत्र्य मिळावे, मुसलमानांचे राज्य नष्ट होऊन आपले राज्य स्थापन व्हावे, देवाधर्माचे संरक्षण व्हावे, तीर्थक्षेत्रे सुरक्षित रहावीत, पूजा व्हावी, यात्रा भराव्यात, स्त्रियांच्या शीलांचे रक्षण व्हावे, गाईंना संरक्षण मिळावे, अशा प्रकारची इच्छा बुद्धीवंताच्या मनात वास करीत होती यालाच महाराष्ट्र धर्माचा विचार असे म्हणतात असे इतिहासचार्य राजवाडे यांचे मत आहे.
- महाराष्ट्र धर्म ही शिवकालीन राजकीय विचारप्रणाली असून तिचे स्वरुप हिंदू धर्मापेक्षा व्यापक आहे. मुस्लिमांचा नाश केल्याशिवाय खऱ्या अर्थाने हिंदू धर्माचे रक्षण होणार नव्हते त्यासाठी मराठ्यांचे एकीकरण करुन त्यांचे नेतृत्व महाराजांना करावे लागणार होते. यातूनच स्वराज्य उदयास येणार होते. यासाठी शिवरायांनी व त्यांच्या अनुयायांनी सर्वस्वाचा त्याग करण्याचे ठरविले.


महाराष्ट्रधर्म



# ब) सामाजिक परिस्थीती (पार्श्वभूमी )

१) मुस्लिमांचे मराठी समाजावरील वर्चस्व -

- दक्षिणेत मुस्लिमांची राजकीय सत्ता असल्याने त्यांचे हिंदू समाजावर भाषा, पोशाख, आहार, सामाजीक चालीरीती धार्मिकबाबी इ. बाबतीत प्रभाव पडून वर्चस्व निर्माण झाले होते.
- मुस्लिम राज्यकर्ते पक्षपाती होते त्यामुळे सरकारबद्दल प्रजेच्या मनात आस्था नव्हती. मुस्लिमांची हिंदूवर शिरजोरी चालत होती.
- इस्लामांच्या हिंदूधर्मावरील आक्रमणामुळे महाराष्ट्रात वारकरी पंथाचा उदय झाला. या पंथाने इस्लाम धर्म व हिंदू धर्म यांच्यातील वैमनस्य कमी करण्याचे तसेच आपल्या धर्मातील लोकांना दिलासा देण्याचे व मार्गदर्शन करण्याचे कार्य केले

# २) सामाजीक विषमता -

- शिवकालीन समाजात जातीसंस्था अस्तित्वात असून जातीची बंधने अत्यंत कडक होती.
- प्रत्येक जातीचा विशिष्ट व्यावसाय होता. समाजात अनेक जाती व उपजाती असून त्यात प्रामुख्याने न्हावी, सुतार, लोहार, कुंभार, महार वगैरे बलुतेदारांचा आणि आलुतेदारांचा समावेश होता.
- तसेच तत्कालीन समाजात भोसले, माने, सावंत, मोरे जाधव इत्यादी प्रतिष्ठीत घराणी होती
- त्यांनी वरील सर्व जाती जमातीच्या लोकांना स्वातंत्र्याच्या भावनेने प्रेरीत करुन त्यांना त्यांच्या कुवतीनुसार स्वराज्याच्या कामाला जुंपले
- महाराष्ट्रातील संतानी संस्कृत भाषेचा त्याग करुन मराठी भाषेचा स्वीकार केला त्यांनी भक्तीच्या मार्गाने सामाजीक समता निर्माण केली  ही समतेची चळवळ स्वराज्याच्या उभारणीस उपकारक ठरली.





# ३) ग्रामीण समाज

- शिवकालीन समाज ग्रामीण जीवन जगत असून बहुसंख्य लोक खेड्यात रहात होते, शहरांची संख्या अत्यंत कमी होती पुरातन पद्धतीने खेड्यांचा कारभार चालत असून खेडे म्हणजे स्वयंपूर्ण छोटेसे राज्यच होते.

- खेड्यातील पाटील, कुलकर्णी, चौगुले इत्यादी वतनदारांनी खेड्याची सेवा केल्याबद्दल सरकारकडून त्यांना इनामी जमिनी आणि हक्क मिळत होते.

- गावातल्या गावातच गोतसभेमार्फत सर्व वादांचा निकाल दिला जात होता. या गोतसभेत पाटील, कुलकर्णी, शेटे महाजन सारखे अनेक वतनदार असत.

- याशिवाय गोतसभेत बलुतेदारांचा देखील समावेश होता धार्मिक प्रश्न तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी ब्रह्मसभेकडून सोडविले जात होते. अशा प्रकारे खेड्यातील समाज स्वयंपूर्ण जीवन जगत होता.

# ४)समाजातील वतनदार वर्ग

- मराठी समाजात वतनास फार मोठी प्रतिष्ठा होती. पाटीलकी, कुलकर्णी, सरपाटीलकी, देशमुखी, सरदेशमुखी, चौगुलपण, शेटेपण इत्यादी नावाची वतने समाजात होती.

- वतन उपजिविकेचे, प्रतिष्ठेचे साधन असल्यामुळे वतनासाठी खून, मारामाऱ्या होत असत देशमुखासारखे वतनदार किल्ले, वाडे बांधून, सैन्य उभारुन राजासारखे जीवन जगत होते.

- बऱ्याच वेळा वतनदाराकडून शिवाजी महाराजांना विरोध होत असे अशा वतनदारांचे वाडे, किल्ले पाडून, वतने रद्द करुन त्यांना महाराजांनी वठणीवर आणले.

# क) धार्मिक परिस्थीती (पार्श्वभूमी)


१) मुसलमानांचे हिंदूवरील धार्मिक अत्याचार

इ.स. १२९४ साली अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेवर स्वारी करुन दक्षिणेत इस्लाम धर्माचा प्रसार सुरु केला. त्याने यादवांचे हिंदू राज्य नष्ट केल्यानंतर दक्षिणेतील हिंदू राजांनी इस्लामी आक्रमणाला थोपविण्याचा प्रयत्न केला तथापि त्यांना यश आले नाही.

पुढील काळात मुस्लीमांच्या लाटेने विजयनगरचे हिंदू राज्य देखील नष्ट करुन टाकले. सर्वच मुस्लिम सत्ताधिशांचे धार्मिक धोरण आक्रमक, असहिष्णू आणि हिंसक होते त्यात प्रामुख्याने दिल्लीचे सुलतान, बहामनी सुलतान, आदिलशाही व निजामशाहीचे सुलतान वगैरे सुलतानांनी मोठ्या प्रमाणात हिंदूवर धार्मिक अत्याचार केले.

हिंदूच्या भव्य मंदिराचा उत्कृष्ट कलाकृतीचा व वैभवशाली नगरांचा नाश केला. लाखो हिंदूना बाटविले अनेक सुंदर स्त्रीयांना आपल्या जनानखाण्यात डांबले अशा प्रकारे जिकडे तिकडे गुंड आणि पुंड माजून हिंदू धर्म संकटात सापडला. हिंदू धर्माची संकटातून मुक्तता करण्याची गरज निर्माण झाली होती.






# मराठी संताची कामगीरी

मराठी सत्तेच्या उदयापूर्वी तीनशे वर्षापासून संतानी महाराष्ट्रात सामाजीक व सांस्कृतिक चळवळ सुरु केलेली होती. या चळवळीचे नेतृत्व वारकरी पंथातील संतानी केले अशा प्रकारे शिवपूर्व महाराष्ट्रात क्रांतीची पार्श्वभूमी तयार होऊन महाराष्ट्राच्या धार्मिक जीवनात अनेक संप्रदाय उदयास आले उदा. नाथ संप्रदाय, महानुभव संप्रदाय, दत्त संप्रदाय, वारकरी संप्रदाय इत्यादीपैकी वारकरी संप्रदाय जास्त लोकप्रिय ठरला या संप्रदायात ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादी प्रसिद्ध संत होऊन गेले.

संत ज्ञानेश्वर –

ज्ञानेश्वरांनी वारकरी सांप्रदायाचा पाया घातला तर संत तुकारामांनी वारकरी पंथावर कळस चढविला संत ज्ञानेश्वर यादवकालीन संत असून त्यांच्या काळात समृद्धी, सुख समाधान होते. तथापि धार्मिक क्षेत्रात अंधश्रद्धा, रुढी, परंपरा, जपतप, व्रतवैकल्ये, यज्ञयाग, कर्मकांड, स्वर्ग-नरक इत्यादीचे स्तोम माजले होते. देवदेवतांना प्रसन्न करुन घेण्यासाठी त्यांना कोंबडी, बकरी यांचा बळी दिला जात होता. सामान्य लोक शेकडो क्षुद्र देवदेवतांची पूजा-अर्चा करीत होते. चातुर्वर्ण पद्धत होती क्षुद्र व स्त्रीयांना धर्मात स्थान दिले नव्हते. धार्मिक अधिकारापासून स्त्रीया व क्षुद्र वंचित होते. ब्राह्मणाशिवाय इतरांना ज्ञान घेण्याचा व ईश्वरापर्यंत जाण्याचा अधिकार नव्हता. ज्ञान संस्कृत भाषेतील ग्रंथात अडकून पडले होते. भक्तीच्या मार्गाने सर्वांनाच परमेश्वरपर्यंत जाता येते. ज्ञान घेण्याचा सर्वांनाच अधिकार असतो असे जाहीर करुन संत ज्ञानेश्वरांनी ब्राह्मणाच्या धार्मिक मक्तेदारीविरुद्ध सर्वप्रथम बंडाचे निशाण फडकविले.




प्रकाश नेला

*"नाचू किर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।"* हे त्यांच्या उपदेशाचे सार होते. त्यांच्यापासून महाराष्ट्रात किर्तनाची परंपरा सुरु होऊन पंढरीच्या विठोबाचा महिमा वाढतच गेला पंढरपूरात चंद्रभागेच्या वाळवंटावर आषाढी-कार्तिकी एकादशीला हजारो, लाखो वारकरी मोठ्या भक्तीभावाने एकत्र येवून विठोबा रखुमाईचा जप करु लागले. *'देव भावाचा भुकेला । जात कळेनाही त्याला* असे या वारकरी मेळाव्याचे ब्रीदवाक्य होते. या संतानी सर्वासाठी भक्तीचा मार्ग खुला केल्याने सर्व जातीतून अनेक संत उदयास आले त्यात स्त्रीया आणि पुरुष होते, उदा. विसोबा खेचर, सावता माळी, गोरा कुंभार, चोखा मेळा, रोहिदास चांभार, जनाबाई, कान्होपात्रा वगैरे..




हिंदू धर्म व संस्कृतीचा झालेला विध्वंस उघड्या डोळ्यांनी पाहिला होता. धर्म आणि संस्कृती संकटात सापडली असताना भागवत धर्माच्या पुनरुज्जीवनाचे महान कार्य एकनाथांनी केले. त्यांनी मराठी भाषेचा पुरस्कार करून चतुश्लोकी भागवत, एकनाथी भागवत आणि भारुडे यातून भागवत धर्माचे ज्ञान सर्वसामान्यपर्यंत पोहोचविले अशा प्रकारे एकनाथांनी हिंदू धर्म आणि संस्कृतीची सेवा केली. अनेक विचारवंतानी त्यांच्या कार्याचा गौरवच केला.



**संत तुकाराम –**


***"ज्ञानदेवे रचिला पाया । तुका झालासे कळस"***

या उक्तीप्रमाणे तुकारामांनी संतमालिकेत कळसाचे स्थान मिळविले होते म्हणूनच त्यांना संतश्रेष्ठ संत 'तुकाराम असे म्हटले जाते. त्यांच्या स्वभावात करुणा, दया आणि माया ओतप्रोत भरलेली होती. त्यांची विठ्ठलभक्ती अवर्णनीय होती. विठ्ठलभक्तीचा प्रसार त्यांनीच खेडापाड्यापर्यंत पोहचविला

***"बुडति हे जन । न देखवे डोळा । येतो कळवला म्हणोनि । जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।***

अशी सामाजीक आणि धार्मिक करुणा त्यांच्या हृदयात वास करीत होती धर्माचे पालन करुन पाखंड वृत्ती नष्ट करण्यासाठी परमेश्वराचे सतत नामस्मरण केले पाहिजे अशा प्रकारचे तत्त्वज्ञान त्यांनी साध्या सोप्या व रसाळ वाणीने मराठ्यांना पटवून दिले त्यांच्यात इश्वर भक्तीचा प्रेमरस निर्माण केला.

- **संत रामदास -**. संत रामदास इतर संताहून वेगळ्या व्यक्तीमत्वाचे होते त्यांनी भक्तीमार्गाचा पुरस्कार केलेला असला तरी त्यांच्या विचारात सामाजीक व राजकीय जाणीव असल्याचे दिसून येते. त्यांनी कडक शब्दात मुस्लिमांच्या अत्याचाराचा समाचार घेतला होता. हिंदू-धर्म, संस्कृती, देव, मंदिरे यांच्या रक्षणासाठी ऐक्याची, शौर्याची व मुत्सद्देगीरीची गरज आहे असे त्यांना मनोमन वाटत होते. शिवरायांनी मराठा सरदारात ऐक्याची भावना वाढीस लावून त्यांचे नेतृत्व केले आणि शौर्य व मुत्सद्दीगीरीच्या जोरावर स्वराज्य स्थापन केले. शिवरायांच्या या महान कार्याची प्रथम ओळख संत रामदासांना झाली होती. आधुनिक संशोधनानुसार रामदास हे शिवाजी महाराजांचे राजकीयगुरु नव्हते हे पुराव्यानिशी सिद्ध झालेले असले तरी त्यांचे महत्व कमी होत नाही. संताच्या कार्याचे महत्व सांगताना न्या. रानडे असे म्हणतात की संताच्या कार्याअभावी महाराष्ट्राचा इतिहास फारच वेगळा झाला असता. थोडक्यात हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी उदयास आलेली चळवळ ही लोकांची होती.


संत तुकाराम
महाराज




# क) आर्थिक परिस्थीती (पार्श्वभूगी)

कोणतेही ध्येय साध्य करण्यसाठी किंवा सुखी जीवन जगण्यासाठी आर्थिक स्थीती चांगली किंवा बरी असावी लागते. शिवकालात मात्र दक्षिणेतील आर्थिक स्थिती अत्यंत वाईट होती. अशा परिस्थितीला बादशहाचे शेतीविषयक धोरण. जमिनदारी पद्धती महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्या इत्यादी घटक कारणीभूत ठरलेले दिसतात.

१) मोगल बादशहाचे शेतीविषयक धोरण-
२) जमिनदारी पद्धत
३) महाराष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण भूरचना
४) नैसर्गिक आपत्या







# भौगोलिक परिस्थीती

महाराष्ट्राला भौगोलिक वैचित्र्य लाभलेले आहे. डोंगर, दऱ्या, पठारे, मैदाने, लहान मोठे पर्वत, नद्या, घनदाट अरण्ये, नाले इत्यादींनी महाराष्ट्र बनलेला असून स्वराज्य स्थापनेचा पहिला प्रयत्न शिवरायांनी सह्याद्री पर्वताच्या खुशीत केला. म्हणूनच या पर्वताला महाराष्ट्राचा भूगोलच नव्हेतर इतिहास घडविणारा पर्वत या नावाने ओळखले जाते. सह्याद्री पर्वतामुळे महाराष्ट्राचे देश आणि कोकण असे दोन भाग पडले आहेत.

**१) देश :** यालाच महाराष्ट्राचा मुख्य भाग म्हटले जाते या भागात गोदावरी भिमा, नीरा, कृष्णा या नद्यांचा प्रदेश येतो. देशातून कोकणात जाण्यासाठी अनेक घाट पार करावे लागतात.

**२) कोकण :** भारताच्या पश्चिम किनाऱ्याला लागून असलेला पश्चिम समुद्र व मुलूखगिरी. सह्याद्रीमधील चिंचोळा भूप्रदेश म्हणजे कोकण होय. कोकण प्रदेशामुळे शिवरायांना आरमाराचे महत्व कळले होते. आरमाराच्या जोरावर महाराजांनी परकीय आक्रमणास थोपवून धरले महाराजांनी सह्याद्री पर्वताच्या रांगावर उभे केलेले किल्ले, दुर्गम पर्वतमय प्रदेश, दऱ्यातील दाट झाडी, उंच उंच कडे इत्यादींनी मराठ्यांना आश्रय दिला. सह्याद्रीच्या खुशीत अनेक नद्यांचा उगम होऊन त्यांनी काही प्रदेश सुपिक बनविला. हा प्रदेश म्हणजे मराठ्यांची पालनपोषण करणारी काळी आई ठरली अशा जमिनीवर दुसऱ्याने आक्रमण करु नये ती जमीन आपल्याच ताब्यात रहावी यासाठी प्रसंगी आक्रमण करण्याची तयारी ठेवावी असा विचार केला जात असे. महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीमुळे मराठ्यांची गनीनीकावा युद्ध पद्धती यशस्वी होण्यास मदत झाली. महाराष्ट्राच्या भौगोलिक वैचित्र्याने इस्लामी सैन्य गारद केले. शत्रूपासून महाराष्ट्राला वाचविले. थोडक्यात महाराष्ट्राचा आकार त्रीकोणाकृती असून महाराष्ट्र कोकण, देश (मध्य महाराष्ट्र, खाणदेश, मराठवाडा) व विदर्भ मिळून बनलेला आहे अशा भौगोलिक परिस्थितीत सतराव्या शतकात महाराष्ट्रात मराठी सत्तेचा उदय झाला.




Vidarbha
Maharashtra
Marathwada
Madhya
Maharashtra
Konkan
& Goa



# मराठी सत्तेच्या उदयाच करणे

१७ व्या शतकातील मराठा सत्तेच्या उदयास ज्या अनेक घटकांनी हातभार लावला या सर्व घटकांचे किंवा कारणाचे मूळ आपणाला तत्कालीन महाराष्ट्राच्या भौगोलिक, राजकिय, सामाजीक, धार्मिक आणि आर्थिक परिस्थितीत सापडते

मराठा सत्तेला नैतिक, धार्मिक, सामाजीक आणि राजकिय अधिष्ठान असल्यामुळे या सत्तेचा सखोल अभ्यास करणे काळाची गरज आहे. मराठा सत्तेचा उदय अचानक किंवा एकाएकी झालेला नसून तिच्या उदयास अनेक घटकांनी हातभार लावला होता.

मराठ्यांचा पहिला इतिहास ग्रँट डफ याने मराठी सत्तेचा उदय म्हणजे "सह्याद्रीच्या जंगलात अचानक भडकलेला वणवा होय" असे म्हटले आहे. तथापि त्याचे मत अवास्तव आणि दिशाभूल करणारे आहे. महाराष्ट्रातील स्वराज्य स्थापना म्हणजे एक दक्षिणेतील क्रांती असून तो एक मोठा वणवाच होता.

तथापि हा वणवा स्वार्थासाठी किंवा लुटारू वृत्तीने अचानक पेटविला नसून मराठ्यांनी स्वातंत्र्यप्रेमाने भारावून मोठ्या आत्मविश्वासाने स्वधर्माचे रक्षण करण्यासाठी पेटविला होता त्यामुळे हा वणवा लवकर विझण्यासारखा नव्हता.

कारण त्याला पेटविण्यासाठी तिनशे ते चारशे वर्ष खर्च करावी लागली होती. याकाळात स्वदेशप्रेम, स्वधर्मप्रेम, निर्मितीची प्रक्रिया, महाराष्ट्र धर्म, स्वाभीमान, राष्ट्रीय अस्मिता इत्यादी भावना वाढीस लागून स्वराज्य उदयास आले असे अनेक इतिहासकारांचे मत आहे. तर फाटक, पगडी आणि आठवले इत्यादी इतिहासकारांनी स्वराज्याचे श्रेय छत्रपती शिवरायांना दिलेले आहे.

महाराष्ट्राची भौगोलिक रचना -

वैशिष्ट्यपूर्ण मराठा सरदार

मराठी भाषा

महाराष्ट्रातील तिर्थक्षेत्रे-

मराठ्यांना लाभलेला प्राचीन वारसा

विजयनगरची प्रेरणा

मराठा सरदारांची सत्ताकेंद्रे -

मुस्लिम राजवटीतील संघर्ष मराठ्यांना फायदेशीर -


गनिमीकावा युद्ध पद्धती

मुस्लिमांचे धार्मिक अत्याचार -

संताची कामगीरी-

जिजावाईचा व शहाजीचा वारसा

**शहाजीराजे जिजाबाई आणि दादोजी कोंडदेव यांचे कार्य =** शिवाजी महाराजांना कर्तबगार बनविण्यात त्यांचे पिता शहाजी माता जिजाबाई व गुरु दादाजी कोंडदेव यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. माता, पिता आणि गुरु यांनी शिकविलेल्या धड्यानुसार शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी विशिष्ट दिशेने सुरुवातीच्या हालचाली केलेल्या दिसून येतात .








# शिवाजी महाराजांच्या सुरुवातीच्या हालचाली

आदिलशहाकडून शहाजीला पुणे, सुपे, इंदापूर इत्यादी ठिकाणची जहागिरी मिळाली होती. इ.स. १६३९-४० मध्ये शिवाजी आणि जिजाबाई यांचे वास्तव्य कर्नाटकातील बंगळूर याठिकाणी होते. पुढे जिजाबाई आणि शिवाजीराजे आपल्या पुण्या जहागिरीत आले. शहाजी राजे यांनी दादोजी कोंडदेव यांना पुणे जहागिरीचा प्रमुख म्हणून नेमले.

तसेच शिवाजीराजांच्या मदतीला चार मंत्री, हत्ती, घोडे, पायदळ आणि द्रव्य शहाजीराजाकडून मिळाले होते ही शिवरायांच्या भावी जीवनाची तयारी होती. अशाप्रकारे वडिलांच्या जहागिरीचा कारभार शिवाजीराजांच्या ताब्यात अला. येथूनच त्यांच्या स्वराज्याच्या उद्योगाला सुरुवात झाली. त्यांनी सुरुवातीच्या काळात मावळ प्रांत, रायगड, सिंहगड, पुरंदर जिंकून घेतले त्यामुळे त्यांचा मोगलाशी संबंध आला.




राजगड


सिंहगड किल्ला


पुरंदर
@punetouristplaces


किल्ले तोरणा

# शिवाजीराजांची राजमुद्रा

शिवाजीराजांनी स्वराज्यनिर्मितीचा उद्योग सुरु केल्यानंतर त्यांच्या कागदपत्रावर शिवाजीराजांची मुद्रा म्हणजेच शिक्का मारण्याची पद्धत सुरु झाली ही मुद्रा किंवा शिक्का संस्कृत भाषेत तयार केली असून तिच्यावरील मजकूर आणि तिचा अर्थ खालीलप्रमाणे-

**"प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।।**
**शाहसुनोःशिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।।**

अर्थ - " प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे क्रमाक्रमाने वाढत जाणारी आणि विश्वाला वंदनीय असणारी शहाजीपुत्र शिवाजी यांची ही मुद्रा सर्वांच्या कल्याणासाठी शोभत आहे. ही मुद्रा केव्हा अमलात आणली याबाबत इतिहासकारात एकमत नाही तरी देखील २८ जानेवारी १६४६ सालच्या शिवाजीराजांच्या राजमुद्रांकित पत्रास अस्सल मानले जाते. या मुद्रेत संस्कृत भाषेतील मजकूर असून यातून शिवाजीराजांचा कारभार लोककल्याणकारी असेल असे रयतेच्या नजरेस आणले आहे.

या राजमुद्रेबाबत रियासतकार गो. स. सरदेसाई म्हणतात " ***ही मुद्रा अत्यंत सार्थ असून ती मराठी राज्याची गुरुकिल्लीच म्हणता येईल, ही सुंदर मुद्रा म्हणजे मराठ्यांचा सारभूत इतिहास व शिवचरित्राचे मुख्य रहस्य दाखविते, या मुद्रेचा तळ हाच शिवाजीच्या उद्योगाचा आरंभ असे निसंदिग्ध म्हणता येते.*** सन १६४७ पासून शिवाजीराजांचा हा उद्योग लोकांच्या मनात चांगला भरुन त्यांच्या कर्तृत्वाविषयी इतका आदरभाव उत्पन्न झाला की, आदिलशाही मुलूखाच्या मानाने मावळ्यातील लोकांना वित्त आणि जीविताची जास्त शाश्वती वाटू लागली.


प्रतिपच्च
द्रलेखेव वर्धिष्णुर्वि
श्ववंदिता शाहसू
नोः शिवस्यैषा मुद्रा
भद्राय राजते


# शिवाजीराजांची साक्षरता

मराठ्यांचा आद्य इतिहास ग्रँट डफ आणि बंगाली इतिहासकार सर जदूनाथ सरकार यांनी काही दाखले देऊन शिवाजी महाराज निरक्षर होते असा विचार मांडला शिवाजी महाराज साक्षर होते की निरक्षर होते याचे उत्तर शोधण्यापूर्वी तत्कालीन रितिरीवाज माहित करुन घेणे आवश्यक आहे. पूर्वी लिहिण्या-वाचण्याचे काम ब्राह्मण आणि प्रभु जातीचे लोक करीत होते. शिवाजी महाराज तर क्षत्रिय असून राज्यकर्ते होते. राज्यकर्ते स्वतःच्या हस्ताक्षरात पत्रे लिहित नसत. सर्व पत्रव्यवहार चिटनीसांनी करुन त्यांनीच वाचून दाखववावयाचा अशी त्याकाळी पद्धत होती. राजे फार तर पत्राच्या मध्यभागी 'श्री' 'श्री महादेव' किंवा शेवटी 'सुज्ञ असा' असे शब्द लिहित असत. यावरुन शिवाजे राजे साक्षर होते असाच निष्कर्ष काढावा लागतो. तात्कालीन विविध जातीच्या मताब्बर घराण्यामधील साक्षर व्यक्तींची अनेक उदाहरणे सापडतात. श्री ग.भा. मेहेंदळे यांनी असे दाखवून दिले आहे की शहाजीराजे संस्कृत जाणणारे विद्वान होते. यावरुन शिवाजी महाराज सुद्धा साक्षर असले पाहिजेत यात वाद नाही. मेहेंदळे यांनी मराठा, धनगर इत्यादी घराण्यातील पुरुषांची हस्ताक्षरे शोधून काढली आहेत. यावरुन महाराजांच्या साक्षरतेचा दाखला मिळतो.

- इ.स. १६८९ साली औरंगजेबानी रायगड किल्ल्यावरील मराठ्यांची कागदपत्रे जाळून टाकली त्यामुळे महाराजांच्या नावाची अगदी अल्प कागदपत्रे मिळतात. अशा थोड्या कागदपत्रातून महाराजांनी लिहिलेले पत्र कसे मिळणार ? आणि त्यांनी स्वहस्ते लिहिलेले पत्र मिळत नाही म्हणून त्यांना निरक्षर म्हणणे योग्य नाही. एखाद्याची साक्षरता ठरविण्यासाठी तो स्वतःलिहिताना दिसला पाहिजे ही कसोटी सुसंगत नाही आजही अनेक लेखक, व्यक्ती सरदार असे आहेत की त्यांचे हस्ताक्षर उपलब्ध नसताना तसेच त्यांना लिहिताना कोणीही पाहिले नाही. तरी देखील त्यांना साक्षर म्हटले जाते उदा. जयराम पिंड्ये, पोर्तुगिज अधिकारी मस्कारनेस महमद आदिलशहा, रजपूत सरदार जयसिंग इ. म्हणूनच शिवरायांनादेखील लिहिता वाचता येत होते असे म्हणण्यास हरकत नसावी.

- याशिवाय शिवाजी महाराज साक्षर असल्याचे अनेक पुरावे मिळतात. उदा. एका इंग्रज अधिकाऱ्याने आपल्या हाताखालच्या नोकराला अशी सूचना केलेली आहे की, संदेश वाहकाने हे पत्र शिवाजीच्याच हातात देण्याची काळजी घ्यावी कारण त्याच्या पदरी असणारे ब्राह्मण आपल्या इच्छेप्रमाणे पत्राचे अर्थ त्याला सांगतात. हा पुरावा अत्यंत महत्वाचा आहे कारण महाराज जर निरक्षर असते तर इंग्रज अधिकऱ्याने अशी सूचना केली नसती.

- छ. शिवाजी राजे यांनी राजापूरचा आपला अधिकारी रावजी पंडित याला स्वहस्ते पत्र लिहून शाहिस्तेखानावरील स्वारीचे वृत्त कळविले होते. असे राजापूरचा इंग्रज वखारवाला फिलीप याने सुरतेस लिहिले होते.




www.KAUSTUBHKASTURE.in

